# रासायनिक खतांमुळे मानवी अस्तित्व संपण्याची भीती

## बी. बी. ठोंबरे यांचे मत; औद्योगिककरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास, हरितक्रांती वरदान की शाप?

**सकाळ वृत्तसेवा**

सोलापूर, ता. १९ : औद्योगिककरणाच्या माध्यमातून पर्यावरणाचा प्रचंड मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होत आहे. त्यामुळे हरितक्रांती वरदान की शाप? असा विचार करण्याची वेळ आली आहे. जलप्रदूषण, वायुप्रदूषण यापेक्षाही भयंकर प्रदूषण म्हणजे शेतीत रासायनिक खतांचा केला जाणारा वापर. या प्रदूषणामुळे मानवी अस्तित्व संपते की काय, अशी भीती निर्माण झाली आहे, असे मत नॅशनल शुगर फॅक्टरीचे अध्यक्ष व संचालक बी. बी. ठोंबरे यांनी व्यक्त केले.



**सोलापूर : एस. एल. कुलकर्णी यांच्या हस्ते किर्लोस्कर वसुंधरा सन्मान पुरस्कार स्वीकारताना बी. बी. ठोंबरे. या वेळी उपस्थित डॉ. पी. प्रभाकर, प्रा. रोहन कुरी, डॉ. विनायक धुळप.**

निर्मलकुमार फडकुले सभागृहात शनिवारी (ता. १९) सायंकाळी सहा वाजता पार पडलेल्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या पुरस्कार वितरण समारंभात श्री. ठोंबरे बोलत होते. यंदाच्या किर्लोस्करचा वसुंधरा सन्मान पुरस्कार बी. बी. ठोंबरे यांना किर्लोस्करचे युनिट हेड एस. एल. कुलकर्णी यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. या वेळी सोलापूर विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. पी. प्रभाकर, प्रा. रोहन कुरी, डॉ. विनायक धुळप उपस्थित होते.

बी. बी ठोंबरे यांनी आपल्या फॅक्टरीच्या माध्यमातून दीपस्तंभासारखे कार्य उभे केले आहे. सेंद्रिय खत निर्मितीचा कारखाना सुरू करून त्यांनी शेतकऱ्यांना २५ हजार टन सेंद्रिय खत पुरवले. प्रामुख्याने दुष्काळाच्या परिस्थितीत उसातील ७० टक्के पाण्याचा पुनर्वापर करून साखर कारखान्यासाठी लागणारे दररोज पाच लाख लिटर पाणी उसातून उपलब्ध केले. पाण्याच्या पुनर्वापरामुळे सांडपाण्याचे प्रदूषण मोठ्या प्रमाणावर कमी झाले.

चार दिवस चाललेल्या 'वसुंधरा'च्या स्पर्धांत एकूण २० महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला होता. महोत्सवाच्या समारोपात त्या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला व विजयी संघांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

विजयी संघ : पथनाट्य : प्रथम : दयानंद कला महाविद्यालय, द्वितीय : ऑर्किड महाविद्यालय, तृतीय : डब्ल्यूआयटी महाविद्यालय. फोटोग्राफी : प्रथम : रूपेश बदनुरे, द्वितीय : नागेश कोंगे, तृतीय : अमोल नळे. घोषवाक्य : प्रथम : सरिता कुलकर्णी, द्वितीय : शिल्पा गोखले, तृतीय : मेघाई गोई. माय आयडिया : प्रथम : कल्याण सारस्वती, द्वितीय : ज्योती सुरवसे, तृतीय : सुनील बिराजदार. ऋषीकेश कुलकर्णी व नरेंद्र काटीकर यांनी सूत्रसंचालन केले. ऋषीकेश कुलकर्णी यांनी आभार मानले.

# पर्यावरण संवर्धनासाठी हवा लोकसहभाग

## आवताडे : 'ग्रीन इनेशिटिव्ह बाय शुगर फॅक्टरी' कार्यशाळा

**सोलापूर, ता. १९ :** साखर कारखान्याचे प्रवेशद्वार जेवढे आकर्षक आणि सुंदर असते तेवढीच सुंदरता व आकर्षकता कारखान्याच्या मागील बाजूसही असायला हवी. साखर कारखान्याची मागील बाजू पर्यावरणाचा ऱ्हास करणारी असू नये. पर्यावरणाच्या संवर्धनासाठी लोकसहभाग आवश्यक असल्याची अपेक्षा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी नवनाथ आवताडे यांनी व्यक्त केली.

किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवात शनिवारी 'डब्ल्यूआयटी'मध्ये 'ग्रीन इनेशिटिव्ह बाय शुगर फॅक्टरी' कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. रांझणी (ता. कळंब, जि. उस्मानाबाद) येथील नॅचरल शुगरचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले. त्या वेळी आवताडे बोलत होते. या वेळी 'डब्ल्यूआयटी'चे प्राचार्य डॉ. शशिकांत हलकुडे, महोत्सवाचे संचालक वीरेंद्र चित्राव, एस. पी. वैद्य., प्रा. नरेंद्र काटीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेत २० साखर कारखान्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

डॉ. हलकुडे म्हणाले, वसुंधरेचा ऱ्हास करण्यात युरोपीय राष्ट्रीय आघाडीवर आहेत. भारताचाही क्रमांक पहिल्या तीनमध्ये आहे. वसुंधरेच्या संरक्षणाचा जागरूक होऊन प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. नैसर्गिक पद्धतीने जीवन जगण्याची आवश्यकता आहे.

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना, लोकमंगल शुगर भंडारकवठे, युटोपियन शुगर या कारखान्यांच्या प्रतिनिधींनी पीपीटीद्वारे सादरीकरण करून कारखान्याच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या पर्यावरण पूरक उपक्रमांची माहिती दिली. सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील कारखान्याच्या प्रतिनिधींनी तोंडी माहिती सादर केली.